नवराष्ट्र

# उत्कृष्ट शिक्षकांचा सहवास लाभला : श्याम वाघ

१९७० साली मॉडर्न कॉलेज सुरू झाले. कॉलेज सुरू होण्यापूर्वी सोसायटीची शाळा होती. तिथूनच मी अकरावीपर्यंतचे शिक्षण मॉडर्न हायस्कुल मधूनच पूर्ण केले. त्यामुळे प्राथमिक शाळेपासून ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेतला विद्यार्थी आहे. आमच्यावेळी ताटके सर जे मुख्याध्यापक होते, ते सोसायटीचे सेक्रटरी होते. ताटके सरांचा कॉलेज सुरू करण्यामध्ये खूप मोठा वाटा आहे. त्यावेळी आमची पहिली बॅच होती. त्यामुळे सर्व हेड ऑफ द डिपार्टमेंट शिकवायला असायचे लिमये सर, गोसावी सर यांच्यासारखे शिक्षक म्हणून आम्हाला लाभले.

ताटके सरांनी पुण्यातील सर्वोत्कृष्ट शिक्षक वर्ग इथे शिकवण्यासाठी नेमला होता. असा उत्तम शिक्षक वर्ग आम्हाला त्यावेळी शिकवण्यास होता. मी शालेय जीवनातही गुणवंत विद्यार्थी होतो. परंतु कॉलेजला गेल्यानंतर अधिकधिक विकसित होत गेलो. बारावीत असताना कॉलेजने आमच्या बॅचवर विशेष कष्ट घेतले होते. त्यावेळी हुशार मुलांचा असा स्वतंत्र गट तयार केला आहे. त्यामुळे अधिकची पुस्तके, माहिती, कोचिंग, वेगवेगळ्या ठिकाणीची माहिती दिली जात होती.

उत्कृष्ट शिक्षकांचा सहवास आम्हाला त्यावेळी लाभला, त्याचा फायदा पुढे बी कॉम पूर्ण केल्यानंतर इंडियन इ न्स्ट ट्यू ट म ध्ये अहमदाबादमध्ये प्रवेश मिळवताना झाला. आयाआयटीला प्रवेशाची सर्व तयारी पदवीच्या काळातच झाली होती. त्यासाठी लागणार आत्मविश्वास , अभ्यास या सगळ्या गोष्टी मला कॉलेजलाच मिळाल्या होत्या. आतापर्यंत आयआयटी अहमदाबादला निवड झालेला मी एकमेव विद्यार्थी असल्याचे मी अत्यंत अभिमानाने सांगू इच्छितो.



पुढे माजी विद्यार्थी म्हणून कॉलेजमध्ये स्पर्धापरीक्षेची तयारी सारखे अनेक उपक्रम राबवले.त्यातही माजी विद्यार्थी म्हणूनही सहभागी झालो. काही वर्षे कॉलेजमध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणूनही शिकवले. आज माझ्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवताना असताना सातत्याने कोलॅजने, शाळेने केलेल्या भक्कम पायाभरणीची आठवण येते. सुरुवातीच्या काळात आम्हा विद्यार्थ्यांवर घेतलेल्या कष्टाची जाणीव ठेवून आम्हीही पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करत आहोत, ज्या ज्यावेळी कॉलेजमधून बोलावले जाते तेव्हा आवर्जून आम्ही तिथे जातच असतो.

त्यावेळी लिमये सर प्राचार्य होते, त्यावेळी जाणीवपूर्वक शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे जास्तीत जास्त लक्ष द्यायला सांगितले, ती गोष्ट आम्ही कधीही विसरू शकत नाही. गोसावी सरांनी लिमये सरांकडून स्फुर्ती घेऊन हुशार मुलांचा गट तयार केला, क्लास व्यतिरिकतही अधिकचा वेळा ते आम्हाला देत, सातत्याने आमच्याशी बोलत असत, अनेक इनपुट्स देता असत. चिरपुटकर सरांचेही आम्हाला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

बदलत्या काळानुसार नवनवीन अभ्यासक्रम कॉलेजमध्ये सुरू करण्याचे काम संस्था करत असते. त्यामुळे नावाप्रमाणेच सातत्याने प्रगतीच्या दिशेने संस्थेची वाटचाल सुरू असलेली दिसून येते. संस्थेचा नाव लौकिक मोठा असल्यामुळे शहराबाहेर अनेक विद्यार्थी शिकण्यासाठी मॉडर्नला प्राधान्य देताना दिसतात. क्रीडा,सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्व स्थरवर कॉलेज कायम अग्रेसर असलेले पहायला मिळते. अलीकडच्या ऑनलाईन शिक्षणाचा प्रभाव वाढत असताना प्रत्यक्ष शिक्षण पद्धती व ऑनलाईन असा दोन्हीचा मेळ घालून शिक्षण मिळणे आवश्यक आहे.